# माहितीचा अधिकार - कलम ४ (प्रोॲक्टीव्ह डिसक्लोजर )

**कु.भारती रा. ठाकरे** रिसर्च फेलो श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती

---

**प्रस्तावना :** १२ ऑक्टोबर २००५ ला विजयादशमिच्या पर्वावर भारत सरकारने भारतीय नागरीकांना एक आगळी वेगळी भेट दिली. सत्तेच्या दुरूपयोगाला विरोध करणारे, भ्रष्टाचाराला आळा घालणारे एक प्रभावी शस्त्र जनतेला प्रदान केले, ते शस्त्र म्हणजे 'माहितीचा अधिकार अधिनियम-२००५' हे होय. शासनाच्या कारभारात पारदर्शकता आणि गतिमानता यावी, सामान्य माणसाला आपले काम करतांना कुठल्याही प्रकारची अडचण येवू नये तसेच प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्याने आपली जबाबदारी व कर्तव्य ओळखून त्याचे प्रामाणिकपणे पालन करावे. या हेतूने माहितीच्या अधिकाराची निर्मिती झाली आहे. आपले काम एखाद्या शासकीय, निमशासकीय कार्यालयातून करणे सोपे झाले आहे. याकरीता आपले काम लवकर व्हावे म्हणून काही गोष्टींची माहिती असणे आवश्यक असते. एखादी माहिती मिळवण्याकरीता एक अर्ज ठरावीक फी भरून करावा लागतो आणि इथेच थोडी अडचण निर्माण होते. एकतर ही माहिती मिळण्याकरीता उशीर होतो किंवा जाणूण - बुजून दिरंगाई केली जाते.या सर्व शक्यता लक्षात घेवून शासनाने कलम ४ चा 'माहिती अधिकार अधिनियम-२००५' या कायद्यात सामावेश केला आहे, परंतू या कलम ४ची माहिती सर्वसामान्य जनतेला नसते आणि म्हणूनच शासकीय अधिकारी कलम ४ कडे दुर्लक्ष करीत आहेत. साधारणपणे सामान्य माणसाला आपले काम करून घेण्याकरीता ज्या गोष्टी माहित असणे आवश्यक आहेत त्या संबंधित कार्यालयाने जाहीर कलम ४ अन्वये त्या-त्या शासकीय कार्यालयावर बंधनकारक केले आहे. हि सर्व माहिती ठळकपणे कार्यालयातील सुचना फलकावर लावणे आवश्यक आहेत . त्याचबरोबर ही सर्व माहिती प्रत्येक प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर सुद्धा उपलब्ध करूण देणे गरजेचे ठरते. म्हणून 'माहितीचा अधिकार' ही संकल्पना अभ्यासतांना या कायद्याचा मूळ गाभा असलेले कलम ४ अभ्यासने आवश्यक ठरते.

**शोधनिंबधाचे गृहीतक :** कलम ४ अंतर्गत प्रत्येक प्राधिकरणाने माहिती खुली केल्यास माहिती अधिकाराची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची गरज न पडता नागरिकांना आवश्यक माहिती आपोआपच मिळू शकते तसेच माहिती अधिकाऱ्याकडे येणाऱ्या अर्जाची संख्या कमी होवून कामाचा ताण कमी होऊ शकतो.

**अभ्यासाचे उद्देश :** 'माहितीचा अधिकार अधिनियम-२००५' मधील कलम ४ (प्रोॲक्टीव्ह डिसक्लोजर ) चा अभ्यास करणे.

**विषय प्रवेश :** माहिती मिळविणे अथवा जिज्ञासा ही मानवाची नैसर्गिक सहजप्रवृत्ती आहे. परंतु कुठलीही माहिती प्राप्त करतांना त्याविषयीचे आकलन होणे आधुनिक नागरी समाजात आवश्यक असते. एखाद्या प्राधिकरणामध्ये माहीती मिळविण्यासाठी त्यासंबंधी पूर्व माहिती असल्यास अथवा त्या सार्वजनिक प्राधिकरणाने स्वतःहून माहिती प्रकाशीत केल्यास पुढील कार्यवाही सोपी जाते . त्यासाठी माहिती अधिकार कायद्यातील कलम ४ महत्वाचे ठरते या कलम ४ नुसार सार्वजनिक स्तरावर त्याची अंमलबजाणी कश्या प्रकारे होईल याचा तपशिल पुढील प्रमाणे

**कलम ४ चा उद्देश** १) प्रत्येक प्राधिकरणाने दरवर्षी जास्तीत जास्त माहिती आपणहून प्रकाशित करणे आणि नागरिकांनी या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी कमीत- कमी प्रमाणात करणे.२) प्रत्येक प्राधिकरणावर कलम ४ नुसार आपणहून माहिती प्रसिद्ध करण्याची जबाबदारी तर आहेच शिवाय बंधनकारकही आहे.

**कलम ४ अन्वये प्रसिद्ध करावयाची माहिती**

१) प्राधिकरणाचे नाव व त्यांच्यातर्फे केली जाणारी कामे ,

२) प्राधिकरणाचे पदाधिकारी व कर्मचारी आणि त्यांची कामे,

३) प्राधिकरणात अवलंबली जाणारी निर्णय प्रक्रिया , पर्यवेक्षणाची पद्धत व उत्तरदायित्व

४) प्राधिकरणाची कार्यपद्धती व त्यांसंबंधीचे नियम,

५) प्राधिकरणाचे कर्मचारी आपले विहीत कार्ये पारपाडण्यासाठी ज्या नियमांचा , निदेशांचा व सुचनांचा व अभिलेखांचा आधार घेतात त्या नियमांची, निदेशांची माहिती,

६) प्राधिकरणाच्या अखत्यारीत असलेल्या सर्व कागदपत्राची यादी ,

७) नेमून दिलेल्या कार्याच्या वा योजनेच्या यशस्वी अंमलबजावणी बाबत नागरिकांची अथवा प्रतिनिधीची मते जाणून घेण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणात केलेल्या व्यवस्थेची माहिती

८) आपल्या अंतर्गत असलेली मंडळे , महामंडळे, समित्या , परिषदा यांनी दिलेली सल्ले व शिफारशी लोकांना कळू शकतील का, त्यांच्या सभा लोकांसाठी खुल्या आहेत का,सभांचा वृत्तांत लोकांना उपलब्ध आहे का याची माहिती,

९) प्राधिकरणाच्या पदाधिकारी व कर्मचारी यांची आवश्यक त्या तपशिलासह सूची ,

१०) प्राधिकरणाच्या प्रत्येक विभागासाठी मंजूर करण्यात आलेले आर्थिक अंदाजपत्रक या अंदाजपत्रकात योजनांचा तपशिल, प्रस्तावित खर्च, वितरीत केलेल्या रकमांचा अहवाल

११) अर्थसाहाय्याने कार्यक्रम कसे राबवले जाते याचा तपशिल, यामध्ये त्यात मंजूर झालेली रक्कम व लाभार्थिचा तपशिल

१२) प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांची नावे , वेतन व भत्ते

१३) सवलत, परवाने किंवा अधिकारपत्रे दिलेल्या व्यक्तिचा तपशिल

१४) संगणकीय माहितीचा तपशिल

१५) माहिती मिळविण्याकरीता उपलब्ध असलेल्या सुविधांचा तपशिल

१६) माहिती अधिकाऱ्यांची नावे व इतर आवश्यक तपशिल

वरीलप्रमाणे माहिती प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने तसेच सेवाभावी संस्थानी स्वतःहून प्रकाशित केल्यास माहिती अधिकाऱ्यावरील कार्यवाही करतांना ताण कमी होईल. त्याचप्रमाणे सामान्य नागरीकांना बरीचशी माहिती सहज उपलब्ध झाल्याने अर्ज करण्याच्या प्रवृत्तीचे प्रमाण साहजीकच कमी होईल , शिवाय नागरिंकाचा वेळ, श्रम आणि पैसा अनावश्यक खर्च होणार नाही .**उदा.** कोणत्या गावाची गाडी केव्हा सुटणार आहे असे वेळापत्रक रेल्वे स्टेशन तसेच एस. टी. स्टॅन्ड मध्ये भिंतीवर रंगविले असल्याने प्रवाशांची उगीचच धावपळ होत नाही असे वेळापत्रक आणि फलक हे प्रोॲक्टीव्ह डिसक्लोजरचाच एक नमूना आहे. त्यामुळे व्यवस्थापणाला देखील एकाच गाडीची वेळ अथवा एकाच प्रकारच्या प्रश्नांचे उत्तर प्रवाश्यांना द्यावे लागणार नाही.

**निष्कर्ष** : प्रस्तूत शोधनिबंधामध्ये (प्रोॲक्टीव्ह डिसक्लोजरकलम ४ हे माहिती अधिकारातील महत्वाचे कलम म्हणून पुढे येते.माहिती अधिकाराची कार्यवाही दिर्घ मुदतीची ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत माहिती अधिकारातील कलम ४ मूळे नागरी समाजाला आवश्यक असलेली माहिती त्याच्या आवश्यक प्राधिकरणाकडून सहजतेने उपलब्ध होवू शकते. शिवाय कामाचा ताण कमी होवून वेळ , श्रम व पैसा खर्च होणार नाही मात्र त्यासाठी सर्व सार्वजनिक प्राधिकरण, विभाग, तसेच सेवाभावी संस्था यांनी माहिती अधिकारातील कलम ४ (प्रोॲक्टीव्ह डिसक्लोजर ) चे स्वतःहून पालन करने अत्यावश्यक ठरते.

**संदर्भ सूची**

१) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५: यशदा, राजहंस प्रकाशन पुणे, २००६

२) कुलकर्णी डि.एस. माहितीचा अधिकार, मनोरमा प्रकाशन, दादर( पुर्व ), २००८

३) Open Sesame : Looking For the Right to Information in the Commonwealth Chogm Report

४) लोकमतः दैनिकवृत्तपत्र ,१ मार्च २००९,पानं क्र: ४